# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.५/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक- ३१ जानेवारी, २०१२

प्रति,
महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर

महोदय,

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक- ३०/७/२०११ च्या अधिसूचनेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवरून लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीच्या प्रयोजनासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या गठित केलेल्या आहेत. यासंदर्भात उच्च न्यायालयासमोर दाखल झालेल्या एका प्रकरणात न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की फेब्रुवारी-२०१२ मध्ये होणाऱ्या महानगरपालिकांची निवडणूक आरक्षित प्रवर्गातून लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना जिल्हानिहाय गठित करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी दक्षता पथकाचा अहवाल न घेताच अगदी अल्पावधीत वैधता प्रमाणपत्र दिलेली आहेत. त्यावर उच्च न्यायालयाने असे आदेश दिले आहेत की दक्षता पथकाच्या अहवालाशिवाय देण्यात आलेले वैधता प्रमाणपत्र बेकायदेशीर व अवैध ठरतात. त्यामुळे अश्या प्रमाणपत्राच्या आधारावर दाखल करण्यात आलेली नामनिर्देशनपत्र ग्राहय धरण्यात येऊ नयेत.

२. आपल्या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून या कार्यक्रमानुसार उद्या दिनांक- १ फेब्रुवारी, २०१२ रोजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामनिर्देशनपत्रांची छाननी करावयाची आहे. तथापि, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करता येणे शक्य व्हावे या दृष्टीने आपण खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करून आवश्यक माहिती कोणत्याही परिस्थितीत दिनांक- १/२/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडे ई-मेल / फॅक्स द्वारे पाठवावी. तसेच सदर माहिती त्यानुसार पाठविली जाईल याची दक्षता घेणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी राहील याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

१. आपल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आरक्षित प्रवर्गातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संदर्भात खाली नमूद केल्याप्रमाणे आरक्षित प्रभागनिहाय माहिती त्वरीत सादर करावी.

(अ) आरक्षित प्रवर्गातून प्रभागनिहाय निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक- ३०/७/२०११ च्या अधिसूचनेन्वये नेमण्यात आलेल्या जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने, वैधता प्रमाणपत्र दिलेल्या उमेदवारांचा संख्या.

(ब) उपरोक्त माहितीच्या आधारे ज्या जिल्हाधिकाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र दिलेली असतील त्यांच्याकडून खालील माहिती प्राप्त करून घ्यावी.

(१) उपरोक्त उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने **दक्षता पथकाकडून अहवाल घेतल्यानंतर** वैधता प्रमाणपत्रे दिलेली आहेत अश्या उमेदवारांची संख्या.

(२) जिल्हानिहाय समितीने वैधता प्रमाणपत्र दिलेल्या उमेदवारांपैकी किती उमेदवारांना **दक्षता पथकाकडून अहवाल न घेताच** वैधता प्रमाणपत्रे देण्यात आली अश्या उमेदवारांची संख्या.

(क) उपरोक्त उमेदवारांच्या नावांची यादी (प्रभागनिहाय) आपल्याकडे तयार ठेवावी.

आपला,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रतः-

सर्व जिल्हाधिकारी यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२. त्यांना विनंती करण्यात येते की उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती माहिती आजच संबंधित महानगरपालिका आयुक्तांना उपलब्ध करून दिली जाईल याची दक्षता घ्यावी.

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग